# कार्यक्रम पत्रिका

## बुधवार, २६ मार्च २०२५

**उद्घाटन :** वेळ ९.३० ते १०.३०

**उद्घाटक :** डॉ. सदानंद मोरे (ज्येष्ठ विचारवंत, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन, मुंबई)

**अध्यक्ष :** मा. सौ. प्रमिलाताई गायकवाड (सरचिटणीस अ.भा.म.शि. परिषद)

### सत्र पहिले : १०.३० ते ११.३०

**विषय :** प्रबोधन परंपरा आणि भारतीय साहित्य

**साधनव्यक्ती :** प्रा. डॉ. रणधीर शिंदे (समीक्षक, प्राध्यापक : मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

**अध्यक्ष :** प्रा. डॉ. शोभा नाईक (ज्येष्ठ समीक्षक-अभ्यासक, बेळगाव, कर्नाटक)

### सत्र दुसरे : ११.३० ते १२.३०

**विषय :** महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा आणि मराठी साहित्य

**साधनव्यक्ती :** डॉ. ताहेर पठाण (प्रभारी, मराठी विभाग, आधुनिक भारतीय भाषा अलीगढ मुस्लीम विद्यापीठ, उत्तर प्रदेश)

**अध्यक्ष :** प्रा. डॉ. एकनाथ पाटील (ज्येष्ठ कवी, समीक्षक, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली)

### सत्र तिसरे (खुले) : १२.३० ते १.३०

**निबंधवाचन**

**अध्यक्ष :** प्रा. डॉ. बालाजी घारूळे (प्राध्यापक, मराठी विभाग, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, जि. अहिल्यानगर)

### समारोप समारंभ : १.३० ते २.३०

**प्रमुख पाहुणे :** प्रा. डॉ. प्रभाकर देसाई (प्राध्यापक : मराठी विभाग, संचालक : भाषा व साहित्य प्रशाळा, संचालक : परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

**अध्यक्ष :** डॉ. विलास पाटील (प्राचार्य, श्री शाहू मंदिर महाविद्यालय)

## आमचे प्रेरणास्थान

मा. श्री. शरदरावजी पवार साहेब (अध्यक्ष, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

मा. श्री. अजितदादा पवार (उपाध्यक्ष, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

मा. श्री. शशिकांत सुतार (उपाध्यक्ष,अ.भा.म.शि.परिषद, पुणे व अध्यक्ष महाविद्यालय विकास समिती)

मा. सौ. प्रमिला गायकवाड (सरचिटणीस, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

मा. ॲड. संदीप कदम (संयुक्त चिटणीस, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

मा. ॲड. भगवानराव साळुंखे (संयुक्त चिटणीस, अ.भा.म.शि.परिषद,पुणे)

## संयोजन समिती :

प्राचार्य डॉ. विलास पाटील (अध्यक्ष)

डॉ. दीपक गायकवाड (मराठी विभाग प्रमुख व समन्वयक)

डॉ. रमेश देसाई (कला शाखा प्रमुख)

डॉ. प्रवीण जाधव (IQAC, समन्वयक)

प्रा. वर्षा पाटोळे

प्रा. नयनिका वाघमारे

डॉ. वैशाली पवार

डॉ. मीना ठाकूर

डॉ. सुदाम शेळके

प्रा. महेंद्र कांबळे

डॉ. गणेश मधे

डॉ. गौरी कुलकर्णी

डॉ. प्रियांका नायकवडी

प्रा. नरेंद्र काळे

श्री. संजय शिंदे (कार्यालय अधीक्षक)

## नोंदणी शुल्क :

सहभाग आणि शोधनिबंध प्रकाशन - १,०००/-

संशोधक विद्यार्थी - रु. ५००/-

G-Pay No. : 9049097037

Registration Link :

https://forms.gle/c3S23791T2crPbcb6

Whats App

https://chat.whatsapp.com/CFSy4KnMn9D1mzdzJ0PFnv

मराठी शोधनिबंध : युनिकोड (मंगल, कोकिळा, कृतीदेव-५०) या फॉन्टमध्ये तर, इंग्रजी शोधनिबंध : टाइम्स न्यू रोमन फॉन्टमध्ये टाईप करून पाठवावेत. शोधनिबंधाची एक ओपन व एक पीडीएफ अशा दोन फाईल्स पाठवाव्यात. (शब्द मर्यादा : १५००)

सदर शोधनिबंध नामांकित Peer Reviewed Journal मध्ये प्रकाशित केले जातील.

शोधनिबंध पाठवण्याचा अंतिम दिनांक २४ मार्च २०२५

इमेल : hodmarathism2025@gmail.com

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे



# श्री शाहू मंदिर महाविद्यालय

पर्वती, पुणे ४११ ००९.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न

Accredited by NAAC 'A' Grade (4th Cycle)

Website : www.shahucollegepune.org

## मराठी विभाग

आयोजित

# एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र (ऑनलाईन)

बुधवार, दिनांक : २६ मार्च २०२५

## विषय

# भारतीय प्रबोधन परंपरा आणि साहित्य

संयोजक

**प्राचार्य डॉ. विलास पाटील**

कार्यालय : ०२०-२४२२१४२४ / २४२२२००६

संयोजक व समन्वयक

**डॉ. दीपक गायकवाड**

(९०४९०९७०३७)

सह समन्वयक

**प्रा. वर्षा पाटोळे**

(९०२८६५७६०१)

## निमंत्रण

**पुणे शहराविषयी :**

पुणे शहर हे सांस्कृतिक व विद्येचे माहेरघर म्हणून भारतभर ओळखले जाते. प्रगत तंत्रविज्ञानाचे शहर म्हणूनही अलीकडच्या काळात पुण्याची नवीन ओळख निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा लालमहाल, महादजी शिंदे वाडा, महात्मा फुले यांचा वाडा, आगाखान पॅलेस, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा अहिल्याश्रम, पर्वतीच्या परिसरातील तळजाई टेकडी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यामुळे पुण्याचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे.

**संस्थेविषयी :**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना तत्कालीन थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक यांच्या दूरगामी विचारांतून सन १९०७ मध्ये धारवाड (कर्नाटक) येथे झाली. संस्थेने २००७ साली शताब्दी महोत्सव साजरा केला. आर्थिक, सामाजिक, राजकीय, समता व न्यायावर आधारित समाजरचना निर्माण व्हावी, समाजातील दुर्बल घटकांची उन्नती व्हावी म्हणून महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सर्व आयुष्य पणाला लावले. या थोर महापुरुषांच्या विचार व कार्याचा आदर्श समोर ठेवून संस्थेची वाटचाल सुरु आहे. संस्थेच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण, शरद पवार, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, केशवराव जेधे, बाबूराव जेधे, पंजाबराव देशमुख, बाबूराव घोलप, उत्तमराव उर्फ अण्णासाहेब पाटील यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. या थोर नेत्यांच्या विचार आणि कार्याने प्रेरित होऊन संस्थेने आपले कार्य चालविले आहे. ग्रामीण भागातील, तसेच समाजातील उपेक्षित घटकांमधील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे ध्येय समोर ठेवून, ते साध्य करण्यासाठी झटणारे व शिक्षणाबद्दल आस्था असणारे संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ही संस्थेची वैशिष्ट्ये आहेत. ६७ एकरांचा विशाल निसर्गरम्य परिसर लाभलेली संस्था कला, वाणिज्य व विज्ञान तंत्रज्ञानाच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

**श्री शाहू मंदिर महाविद्यालय :**

श्री शाहू मंदिर महाविद्यालय हे स्थापनेपासूनच महाराष्ट्रातील एक अग्रगण्य महाविद्यालय राहिले असून ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते या महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचा पायाभरणी समारंभ १९६० मध्ये संपन्न झाला. नुकतीच बंगलुरू येथील 'राष्ट्रीय मूल्यांकन व आधी स्वीकृती परिषद' या संस्थेच्या समितीने महाविद्यालयास भेट देऊन मूल्यांकन केले. श्री शाहू मंदिर महाविद्यालय हे गेली पन्नास वर्षे समाजातील सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे व त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे मोलाचे कार्य करीत आहे, ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय मूल्यांकन व आधी स्वीकृती परिषदेने (NAAC) महाविद्यालयाला सलग तीन वेळा 'अ' दर्जा दिला आहे.

''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' या तत्त्वानुसार महाविद्यालय वाटचाल करीत आहे. एनसीसी, एनएसएस, बहिःशाल शिक्षण मंडळ, विद्यार्थी विकास मंडळ, यांसारख्या पुणे विद्यापीठाशी संलग्न अशा विविध योजना महाविद्यालयात राबविण्यात येतात. त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी होतो.

**मराठी विभाग :**

मराठी विभागाने आतापर्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. या विभागात आजपर्यंत अनेक तज्ज्ञ, कला व साहित्यक्षेत्रात नावाजलेल्या लोकप्रिय व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहेत. डॉ. आनंद यादव, डॉ. अशोक कामत, डॉ. सुधाकर भोसले, डॉ. वीणा देव आदी साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात नावाजलेली मंडळी मराठी विभागात अध्यापनाचे काम करीत होते. आजही ही परंपरा चालू आहे. इ. ११ वी ते एमएपर्यंत वर्ग चालतात. मराठी वाङ्मय मंडळ, भित्तिपत्रक यांसारख्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त उपक्रमशील योजना राबवल्या जातात. मराठीतील नामवंत लेखक, अभ्यासक, विचारवंत, तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी विभागात वेळोवेळी आमंत्रित केले जाते. विविध विषयांवरील चर्चासत्रे, व्याख्यानमाला आणि इतर वाङ्मय उपक्रम मराठी विभागामार्फत राबविले जातात.

**चर्चासत्रा विषयी :**

महाविद्यालयात सातत्यपूर्ण महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सत्रांचे आयोजन केले जाते. संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना आवश्यक असणारे विषय चर्चिले जातात. यावर्षी **''भारतीय प्रबोधन परंपरा आणि साहित्य''** या महत्त्वपूर्ण विषयावर हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. सदर चर्चासत्रास प्राध्यापक, अभ्यासक व संशोधकांनी सहभाग घेऊन आपला अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर करावा. मराठी, हिंदी व अन्य भारतीय भाषांमधील प्रबोधन परंपरेच्या अनुषंगाने शोधनिबंध सादर करावेत.

**उपविषय :**

१. प्रबोधनाची संकल्पना आणि साहित्य

२. प्रबोधन परंपरा आणि भारतीय साहित्य

३. महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा आणि मराठी साहित्य

४. प्रबोधन परंपरा आणि साहित्य-चळवळी

५. प्रबोधन परंपरा आणि भारतीय इंग्लिश साहित्य

६. प्रबोधन परंपरा आणि भारतीय हिंदी साहित्य

७. प्रबोधन परंपरा आणि स्त्रीवादी साहित्य

८. प्रबोधन चळवळीतील खालील प्रबोधक आणि साहित्य :

महात्मा गौतम बुद्ध, चार्वाक, महात्मा बसवेश्वर, भगवान महावीर, अखिल संत मंडळी, सुफी परंपरा, राजमाता जिजाऊ, शिवाजीमहाराज, कबीर, राजा राममोहन राय, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी दयानंद सरस्वती, राजारामशास्त्री भागवत, न्या. म. गो. रानडे, रा. गो. भांडारकर, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी, सयाजीराव गायकवाड, पेरियार स्वामी, मिर्झा गालिब, प्रबोधनकार ठाकरे, हमीद दलवाई, कॉम्रेड शरद पाटील व इतर.

या चर्चासत्रातील आपला सहभाग निश्चितच मोलाचा ठरणार आहे. आपण आपल्या महाविद्यालयातील संबंधित विषयांच्या प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना शोधनिबंध पाठवण्यास सूचित करावे.